ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-I, Issue-VI April 2013

# स्वातंत्र्यपूर्व काळातील आदिवासी विकासाचा इतिहास

**प्रा. प्रधान रामकुमार,**
**सहाय्यक प्राध्यापक,**
**एस्. एन्. डी. टी. कला व एस. बी. बी. वाणिज्य,**
**आणि विज्ञान महिला महाविद्यालय,**
**मुंबई – 20.**

***सारांश :***

आदिवासी जमातीच्या कल्याणकारी राज्याची भूमिका स्पष्ट करत असतांना, अनेक राष्ट्र–राज्य निरनिराळ्या मानववंशांनी बनलेले आहेत. मात्र कोणत्याही राज्यपध्दतीत आदिवासींचा सक्षम मानववंश बनला नाही. सांस्कृतीक व राजकीयदृष्टया ते बाहरच राहिले आहेत. तत्कालिन राज्यकर्ते व आदिवासी यांच्यातील संबंधांचा प्रभाव आदिवासीच्या धोरणाच्या स्वरुपावर पडत आलेला आहे. विविध राजकीय विचारधारांचा तसेच त्या तयार होण्यामागच्या ऐतिहासिक परिस्थितीचा प्रभाव राष्ट्रांवर पडत असतो. मानवी सभ्यतेपासून दूर दुर्गम भागात राहणाऱ्या वांशिक समुहाकडे पूर्वी दुर्लक्ष केली गेले होते. युरोपीयन वसाहतीचा प्रसार आणि आधुनिक राज्यपध्दती या दोन बाबींमुळे आदिवासी आणि बिगर आदिवासी एकमेकांच्या संपर्कात आले. सरंजामशाही असलेल्या रशिया, चीन, भारत अणि मध्यपूर्वेतल्या देशातून त्यांच्या हिताप्रमाणे आदिवासीबाबत वेगवेगळी धोरण होती. आदिवासी कडून मिळणारे उत्पन्न किफायतशीर नसल्यामुळे राज्यकर्ते व आदिवासी यांच्यातील संबंध सुधारण्याजोगे नव्हते. वेगळे मानववंशीय समुह म्हणून आदिवासी समुदायाची ओळख कायम राखली गेली. वेगळा राहिलेल्या या समुदायाकडे दुर्लक्ष करण्यात आले. आदिवासी कडे वेगळया वंशाचे आणि राजकीयदृष्टया स्वतंत्र असल्याचे मानून राज्य पध्दतीत मिसळू दिले गेले नाही. आदिवासींच्या दुर्गम भागात जाऊन मिशनऱ्यांनी केलेले कार्य महत्वपूर्ण आहे. परंतू हेही अमान्य करता येत नाही की मिशनऱ्यांचा हेतू धर्मांतराचा नसता तर त्यांच्या कामाचे महत्तव द्विगुणीत झाले असते. काही समाज सेवकांनी आदिवासी कल्याणासाठी प्रयत्न केलेले दिसते.

औद्योगिक विकासाला सुरुवात झाल्यानंतरच आदिवासी रहात असलेल्या प्रदेशात येथील लोकसंख्या आणि त्यांच्या नियंत्रणाखालील असलेली साधनसंपत्ती यामुळे महत्त्व प्राप्त झाले. राजकीय आणि आर्थिक फायद्यासाठीही ते प्रगत समाजाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले. पाशवी बलप्रयोग आणि विचारधारा लादून त्यांच्यावर वर्चस्व प्रस्थापित करण्यात आले.

**मुख्य संज्ञा : कल्याणकारी राज्यात आदिवासी विकास**

**कल्याणकारी राज्य :**

अर्थाल्ड टॉयन्बी या महान इतिहासकाराने असे मत व्यक्त केले होते की, 20 व्या शतकाचे स्मरण केले जाईल ते त्यातील गुन्हे, भय वा युध्दासाठी नव्हे, तर मानवी इतिहासातील हा असा पहिला कालखंड होत की ज्यात लाभ संपूर्ण मानव वंशाला लाभ उपलब्ध व्हावा असा विचार करण्याचे धारिष्टय लोकांनी दाखवले म्हणजेच सभ्यतेचा लाभ सर्व मानवांपर्यंत पोहोचविण्याचा कल्याणकारी राज्य हा महामार्ग आहे. कल्याणकारी राज्य मानवतावाद आणि समाजवाद यामधील एक समझौता आहे. मानवतावाद मानवाला अधिक महत्त्व देत असतो. तर समाजवादात मानवाला कमी मानून राज्याला अधिकाधिक महत्त्व दिले जाते. परंतू कल्याणकारी राज्य दोन्ही राज्यांना आणि मानवाला महत्त्व देतो. असे सामान्य लोकांची खुशी आणि त्यांचे कल्याण याला प्रोत्साहन देतो.

प्राचिन आणि मध्ययुगातील राज्यकर्ते व प्रशासकीय यंत्रणा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कल्याणकारी राज्याची भूमिका कमी जास्त प्रमाणात पार पाडत असतात. महाभारत कौटील्याचे अर्थशास्त्र या ग्रंथातून हिताची काळजी घेणारा राजा कसा श्रेष्ठ ठरतो याचे वर्णन केलेले आढळते. आधुनिक राज्याची कार्ये केवळ पोलिस राज्याची राहिलेली नसून ती अधिक व्यापक कल्याणकारी बनलेली आहेत. आधुनिक काळात कल्याणकारी राज्याचा विचार प्रभावी होण्याचे सर्वात महत्वाचे कारण म्हणजे औद्योगिक क्रांतीनंतरच्या कालखंडात कामगाराचे प्रश्न, आरोग्य, शिक्षण, बेकारी, दारिद्रय इत्यादी समस्या निर्माण झाल्या. भांडवलदार व मजूर यांच्यातील समस्या जन्माला आली. मोठया प्रमाणात उत्पादित केलेल्या वस्तूचे देशात व विदेशात वितरण कसे करावे असा प्रश्न निर्माण झाला. आंतरराष्ट्रीय व्यापारी संबधं वाढले. अशा स्थितीत राज्याला अर्थव्यवस्थेत हस्तक्षेप करावा लागला. 20 व्या शतकात जगात दोन महायुध्दे झाली या महायुध्दाचे अनेक दुष्परिणाम झाले. अनेक देशाची अर्थव्यवस्था कोलमडली. बेकारी वाढून देशात अनेक समस्या निर्माण झाल्या. देशाची आर्थिक स्थिती सावरण्यासाठी राज्याला लोकजीवनात हस्तक्षेप करावा लागला.

कल्याणकारी राज्याची उद्दिष्टे माणूसकीवर आधारित पुरोगामी समाजाची निर्मिती आहे. राज्याने फक्त कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याचे कार्य करावे व नकारात्मक भुमिकेपासून दूर जाऊन राज्य संस्थेने व्यक्तीच्या कल्याणासाठी व्यापक कार्य करावे अशी त्याची सकारात्मक भूमिका आहे. जी.डी.एच. कोल या विचारवंताच्या मते प्रत्येक नागरीकास किमान राहणीमान आणि विकाससंधी ज्या समाजात राज्यांना उपलब्ध होते. ते कल्याणकारी राज्य होय. तर जे राज्य आपल्या नागरिकांना विविध प्रकारची सामाजिक सेवा उपलब्ध करुन देते ते कल्याणकारी राज्य होय असे टी.डब्लयू केंट यांचे मत आहे. अमर्त्य सेनच्या मते कल्याणकारी राज्य एक व्यवस्था आहे ज्यात सरकार आपल्या सर्व नागरिकांना रोजगार शिक्षण आरोग्य सुविधा सामाजिक संरक्षण आणि निवास व्यवस्था पुरविणे आवश्यक आहे. पं.

नेहरु मते कल्याणकारी राज्यात संबंध रोग अज्ञानता अणि आळस नष्ट करण्यासाठी लोकांना प्रेरणा दिली जाते.

संयुक्त राष्ट्रसंघातील तज्ञांनी विकासाची संकल्पना मांडतांना असे म्हटले आहे की, सामाजिक सांस्कृतिक आणि राजकीय तसेच आर्थिक घटनांचा सातत्याने वाढणाऱ्या आणि वेगवेगळया गरजांची पूर्तता होण्यासाठी देशाच्या प्रशासनास आणि मूल्य पध्दतीचा क्षमता वाढविण्याची प्रक्रिया म्हणजे विकास.

आदिवासी विकास म्हणजे सामाजिक सांस्कृतिक आणि आर्थिक प्रगतीच्या विविध टप्प्यावर असलेल्या वेगवेगळया जमातीचा उत्कर्ष. धारणाची व कार्यक्रमांची आखणी तसेच देशातील मुख्यप्रवाहाच्या तुलनेने मागास असलेल्या आदिवासींच्या विकासाच्या दृष्टीने कार्यक्रमांची प्रत्यक्ष अंमलबजावणी म्हणजे आदिवासी विकास होय.

**स्वातंत्र्यपूर्व काळातील आदिवासी विकास कार्यक्रमाचा इतिहास :**

भारतात ब्रिटीशांची सत्ता स्थापन झाली. संपूर्ण देशावर ब्रिटीशांचा एकछत्री अंमल सुरु झाला. आपले साम्राज्य अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने ब्रिटीशांचा संबंध आदिवासी लोकांशी आला. परंतू आदिवासींचे खरे शोषण त्या भागातील जमीनदारांनी केले. त्यामुळे आदिवासीच्या मनात त्यांच्याविषयी विलक्षण चिड निर्माण होऊन त्यांनी शोषकांविरुध्द बंड केले. बंगालमधील राजमहाल पहाडीया लोकांनी हिंदू जमीनदारांविरुध्द बंड केले. सिंगभूम जिल्हयातीलही आदिवासी लोकांनी आंदोलन केले. त्यानंतर संथाल, नागा, लुशाई आदिवासींनी बंडाचे निशान उभे केले होते. भारतात एकछत्री राज्य कारभार प्रस्थापित करण्यासाठी ब्रिटिशांनी बळाचा वापर करुनही सर्व बंड मोडून काढली. ज्या भागात आदिवीसंनी बंड फुकले होते आणि जिथे असंतोष होता. त्या भागात ब्रिटीश शासनाने शासनाधिकारी नियुक्त करुन त्या दिवाणी फौजदारी अधिकार देण्यात आले. काही काळानंतर ब्रिटीशांनी आदिवासींच्या संदर्भातील धोरणात बदल केले. सन 1772 मध्ये या भागातील प्रशासकीय अधिकाऱ्यास काढून घेवून स्थानिक आदिवासी नेत्याकडे न्याविषयक अधिकार देण्यात आले. 1782 मध्ये ऑगस्टस क्लीवलॅड यांचे शिफारशीनुसार राजमहाल मधील पहाडी प्रदेश सर्वसाधारण प्रशासनापासून वेगळा करण्यात आला. स्थानिक आदिवासी नेत्याकडे न्याय विषयक अधिकार देण्यात आले. या जमातींचा जमीदांराबरोबर संबंध तोडण्यात आले. आदिवासी अधिकार देण्यात आले. या जमातींचा जमीदारांबरोबरचे संबंध तोडण्यात आले. आदिवासी जमाती बंड करु नये म्हणून ब्रिटीशांनी त्यांच्या कामकाजात ''कमीत कमी हस्तक्षेप'' हे धोरण स्वीकारले होते. एवढे करुनही ब्रिटिशांमध्ये अदिवासी जमातीविषयी दुरदृष्टीचा अभाव आहे. कारण आदिवासी जमातीमधील काही काही वर्गाला अपराधी घोषित करुन त्यांच्यावर ''अपराधी जन– जाती कायदा'' लावण्यात आला व कठोर शिक्षेची तरतुद करण्यात आली.[2] सन 1796 साली आदिवासी

क्षेत्रासाठी कायदे तयार करण्यात आले. हा कायदा अदिवासी जमातींसाठी प्रभावी ठरला नाही. प्रशासनात भ्रष्टाचार वाढला व अयोग्य व्यक्तींची भरती होऊ लागली. परिणामी यात शासनाला अपयश आले. सन 1827 मध्ये नविन अधिनियम जारी करुन आदिवासी समाज पंचायतींना न्यायदानाचे अधिकार देण्यात आले.

आदिवासी क्षेत्रातील ही व्यवस्था सन 1855 पर्यंत सुरु राहिली. संथाल जमातीच्या बंड खोरीनंतर प्रशासकीय दिवाणी फौजदारी अधिकार देण्यात आले. सन 1874 मध्ये अनुसूचित कायदा पास करण्यात आला. या कायदयानुसार प्रशासनासाठी क्षेत्रात कायदे करण्याचा अधिकार देण्यात आला आदिवासींना देशातील जनतेपासून दूर ठेवण्याचा आणि आदिवासी प्रदेश सर्वसाधारण प्रशासनाच्या मर्यादेतून बाहेर ठेवण्याचे धोरण ब्रिटीश सरकारने स्वीकारले होते.[2]

1919 मध्ये 'गवर्नमेंट ऑफ इंडिया' कायदा पास झाला. या कायदयातील कलम 52 ए (2) अनुसार गव्हर्नर जनरलला अधिकार देण्यात आले की, जे विभाग मुख्यता मागासलेले आहेत ते सर्वसाधारण प्रशासनांपासून वेगळे करावे. तेथील परिस्थितीनुसार एक वेगळया प्रकारची शासन व्यवस्था लागू करावी. अशाप्रकारे सर्वसाधारण प्रशासनांपासून वेगळे केलेले दोन प्रकारचे होते. 1) अंशत : वगळलेले प्रदेश (Partially Exclusded Area) 2) संपूर्णतः वगळलेले बाहय प्रदेश (Wholly Excluded Area) या संपूर्णतः वगळलेले बाहय प्रदेशातील काही प्रदेशांना त्यावेळी विधान सभेत आपले प्रतिनिधी पाठविण्याचा अधिकार देण्यात आला नाही. काही प्रदेशातील प्रतिनिधी नामनिर्देशतीत करण्याचा अधिकार सरकारने आपल्या हाती ठेवला. आणि काही प्रदेशांना आपले प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार देण्यात आला. प्रशासनाने हे धोरण 1935 पर्यंत कायम राहिले. [3]

सन 1935 मध्ये 'गवर्नमेंट ऑफ इंडिया' कायदयामध्ये सुधारणा करुन आदिवासी लोकांसाठी चौकशी समिती नेमण्यात आली. या कायदयानुसार काही विभाग मंत्र्यांकडे सोपविण्यात आले. या मध्ये सुध्दा संपर्णतः वगळेले बाहय प्रदेश (Wholly Excluded Area) या संपूर्णतः वगळलेले बाहय प्रदेशातील मंत्र्यांकडे कोणतेही अधिकार देण्यात आले नाही. परंतू अंशतः वगळलेले प्रदेशातील मंत्र्यांना अधिकार देण्यात आले. ब्रिटीशांनी चौकशी समिती स्थापन करुनही कायदे केले नाही.[4] यावरुन ब्रिटिशांची आदिवासी जमाती विषयीची नकारातम्क भूमिका स्पष्ट होते. ते आदिवासींवर दबाव टाकून संधी मिळताच त्यांचे शोषण करु पहात होते.

आदिवासीची ओळख शोधून भारतीय जनसामान्य समाजापासून त्यांना वेगळे करण्याची ब्रिटीश शासनाच्या फोडा आणि झोडा (Divide & Rule) या नितीचा एक म्हणजे आदिवासींचे विभक्तीकरण होय. विकासाच्या नावावर जनसामान्य समाजापामसून त्यांना विभक्त केल्यामुळे आदिवासींचे शोषण करण्यासाठी मार्ग सुकर होतो. असे ब्रिटीश शासनाने ठामपणे ठरविले होते. हे करण्यासाठी आदिवासींच्या

सांस्कृतीक, ऐतिहासीक, सामाजिक, राजकीय व आर्थिक जीवनाचा अभ्यास करण्यासाठी आदिवासींच्या वेगवेगळया भागासाठी ब्रिटीश शासनाने प्रशासक विद्वान आदिवासी भागात प्रवास करणारे आणि ख्रिश्चन मिशनरी इत्यादींना पाठविण्यात आले.

आदिवासींचे विभक्तीकरण करण्यासाठी 1) आदिवासी भागातील प्रशासन 2) सामाजिक सांस्कृतिक, ऐतिहासिक बाबींचा अभ्यास 3) ख्रिश्चन मिशनरीच्या माध्यमातून पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रसार करणे या बाबींवर अहवाल तयार करुन संपूर्णतः वगळलेले बाहय प्रदेश व अंशतः वगळलेले प्रदेश तयार केले गेले. आदिवासी हे हिंदू नसल्यामुळे त्यांच्यावर ख्रिश्चिन धर्मप्रभावाने ख्रिश्चिन वसाहत निर्माण करणे ब्रिटिशांच्या Divide & Rule या नितीचा एक भाग होता. [5]

आदिवासींच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने ब्रिटीश शासनाने विशेष कार्य केले नाही तरी काही ख्रिश्चनमिशनरी, समाजसेवक व अभ्यासकांनी थोडेफार कार्य केले आहे. धर्म प्रसाराच्या प्रेरणे भारावून गेलेल्या ख्रिश्चनमिशनरींनी आदिवासी विकासासाठी महाराष्ट्रातील कल्याण मध्ये चर्च ऑफ दि ब्रेदरेन मिशन या अमेरिकन संस्थेतर्फे रेव्हरंड ॲडम एबी यांनी 1903 साली वारली जमती करिता लहान दवाखाना उघडला, तर इ. स. 1923 साली मिशनने पालघरला ग्रामीण वस्तीशाळा उघडली होती.[6] आदिवासी जमाती मुख्य प्रवाहत मिसळत अतसांना काही आदिवासींदी हिंदू धर्म स्विकारला तर काहींनी ख्रिश्चनधर्म स्विकारल्याच मत क्रोबरनी नोंदवला आहे. मानवतेच्या व्यापक दृष्टीकोनातून या आदिम कार्याकडे पाहिले तर आदिवासींच्या दुर्गम भागात जाऊन मिशनऱ्यांनी केलेले कार्य महत्वपूर्ण आहे. परंतू हेही अमान्य करता येत नाही की, मिशनऱ्यांचा हेतू धर्मांतराचा नसता तर त्यांच्या कामाचे महत्त्व द्विगुणीत झाले असते. श्री. ए.बी. ठक्करबाप्पानी मानवता भावनेतून आदिवासी कल्याणाची रुपरेषा तयार केली. सन 1922 मध्ये त्यांनी गुजरात मध्ये भिल्ल सेवा ही संस्था स्थापन केली. याच संस्थेद्वारा 1932 मध्ये गुजरात मधील पंचमहाल जिल्हयातील भिल्ल आदिवासी लोकांसाठी काही कार्यक्रम हाती घेतले. महाराष्ट्रातील खानदेश मध्ये सन 1918 मध्ये खानदेश भिल्ल सेवा मंडळ ही संस्था स्थापन केली आणि निस्वार्थपणे कार्यास वाहून घेणाऱ्या आदिवासींची फळी तयार केली.[7] त्यांची आर्थिक प्रगती साधण्यासाठी शिक्षणाचा प्रसार केला. शिक्षणाकरीता गुरुकुल प्रणाली, मुलभूत शिक्षण तसेच नैतिकता यांना आदर्श मानून आदिवासी कल्याणासाठी प्रयत्न केले.[8] त्यांच्या प्रेरणेने सर्वत्र भिल्ल सेवा मंडळ व आदिम जाती सेवा संघ अस्तित्वात आले. डॉ. व्हेरियर एल्वीन ज्या ज्या आदिवासी गांवांना भेट देत असत त्यावर इंग्रजांची करडी नजर होती. त्यांना आदिवासी शाळा उघडण्यास परवानगी नाकारण्यात आली होती.[9]

भारतीय मंत्र्यांच्या हातात सत्ता आली तेव्हापासून शासनाच्या दृष्टिकोनात बदल होऊ लागला. आदिवासी विकास, त्यांचे सामाजिक आणि आर्थिक उन्नती ही भावना जन्माला आली. 1935 नंतर विविध प्रांतामध्ये भारतीय मंत्रीमंडळ आले. त्यांनी आदिवींच्या स्थितीचा विचार करण्यासाठी समीती गटीत

करणे सुरु केले. या समीतींनी आपले काम पूर्ण करण्यापूर्वीच दुसऱ्या महायुध्दाची सुरुवात झाली व काँग्रेस मंत्रीमंडळाने राजीनामा दिला. यानंतर आदिवासींच्या इतिहासाचे स्वातंत्र्यानंतर दुसरे पर्व सुरु झाले.

**संदर्भ :**

1. आदिवासी समाजाचा विकास : एक चिकित्सक अभ्यास डॉ. चंद्रकांत पुरी, परम मित्र पब्लिकेशन, ठाणे 2010 पृष्ठ क्र. 15.
2. विद्यामार्तंड, कर्नल सत्यव्रत सिध्दांतलंकार, सामाजिक मानवशास्त्र, सरस्वती सदन प्रकाशन, दिल्ली पृष्ठ क्र. 244
3. पूर्वोक्त. पृष्ठ क्र. 245
4. पूर्वोक्त. पृष्ठ क्र. 245
5. एल. के. मडावी,आदिवासी स्वायत्तेची भूमिका, लता मडावी प्रकाशक, नागपूर पृष्ठ. क्र. 14
6. माधव कशीळकर, प्रा. जयवंत कांबळे, आदिवासी भारत, अजब पुस्तकालय , कोल्हापूर
7. डॉ. प्रदिप आगलावे, आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर 2007 पृष्ठ क्र. 204, 205
8. पूर्वोत्तर डॉ. चंद्रकांत पूरी, पृष्ठ क्र. 16.
9. जॉन गायकवाड, हाकरा, अंक पहिला व दुसरा जाने जून,मानव विज्ञान परिषद,पूणे, 1989 पृष्ठ क्र. 14
10. ठाणे जिल्हयातील ठाकर व कातकरी सामाजिक व आर्थिक विकासाचा अभ्यास–सन 1951 ते 2001–श्री चंद्रमणी मोहिते, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक – 2011 पृष्ठ क्र. 247.